MHRG080015082021

फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.३२९/२०२१

निशाणी क्र.४ वरील आदेश

( निलम पाटील वि. सतिष पाटील )

१. अर्जदाराने मुख्य अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे. सदर निशाणी क्र.५ चा अर्ज अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात असे कथन आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक ०६/०३/२०१६ रोजी झालेला आहे. सदर विवाह भारत मेट्रोमोणी या वेबसाईटवर दोघांनी नोंदणी केली होती. त्यानंतर दोघांनी रितसर रितीरिवाजा प्रमाणे दोन्ही घरच्यांच्या संमतीने सदर विवाह ओमकार मंगल कार्यालय आळंदी, ता. खेड, जि. पुणे येथे झालेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांचा दोघांचाही सदर विवाह दुसरा असुन याची कल्पना लग्ना आधी अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांना दिली होती. लग्नानंतर अर्जदार सामनेवाला याच्या राहत्या घरी शुभम सोसायटी वडगाव शेरी येथे रहायला गेली. लग्नानंतर काही दिवसात सामनेवाला हा अर्जदारला त्रास देवू लागला अर्जदारच्या घराच्या बाजूला इलेक्ट्रॉनिक्स रिपेअरींगचे दुकान आहे. तेथिल दुकानदार दादाचे व अर्जदाराचे बहीण भावा सारखे नाते होते. त्यामुळे लग्ना नंतर १५ दिवसांनी अर्जदारला त्यांचा विचारपुस करण्यासाठी फोन आला होता. सदर कॉलची सामनेवाला याने रेकॉडींग केली होती. त्यावरुन सामनेवाला ने अर्जदारला घान शिवीगाळ केली. सामनेवाला याने अर्जदारचे तोंड दाबून ठेवले व तिला मारहाण केली. त्यानंतर सामनेवाला याने अर्जदारचा फोन नंबर बदलला व अर्जदारला सर्व नंबर डिलीट करायला लावले. सन २०१६ मध्ये अर्जदार व सामनेवाला हे देवळात जात असतांना सामनेवालाने अर्जदारचा पदर उजव्या खांद्यावर दिला परंतु अर्जदारच्या कानातले खाली पडले ते उचलण्यासाठी अर्जदार खाली वाकली व पदर पडला म्हणून अर्जदारने पुन्हा पदर ठिक केला त्यावरुन सामनेवाला अर्जदारला तेथेच ठेवून घरी निघून गेला. अर्जदार रडत रडत व विचारत घरी आली. त्यावेळी सामनेवाला बोलला कि, पाठ दाखवुन आणि पोट दाखवून बुधवार वाडयातील बायकांसारखे करणार आहेस का असे अश्लील शब्द बोलला. अर्जदार ही माहेरील लोकांसोबत सामनेवाला सह पंढरपूर येथे देवदर्शनासाठी गेलेली असतांना ती तिच्या काकाच्या मुलासोबत बोलत होती त्याचा राग येवून सामनेवालाने अर्जदारला अश्लील शिवीगाळ केली. सप्टेंबर २०१६ मध्ये देखील सोसायटीची मुले गणपतीची वर्गणी गोळा करण्यासाठी आलेली असतांना त्यावेळी देखील सामनेवाला याने अर्जदारच्या चारित्र्यावर संशय घेतला व तिला सकाळी ५:३० ते संध्याकाळी ४

वाजे पर्यंत घरात लॉक करुन ठेवले. सामनेवाला अर्जदारवर छोटया छोटया गोष्टीसाठी निबंर्ध घालत होता. सामनेवालाच्या मोठया भावाची बायको रुपाली होती व रुपालीची बहीण वृषाली ही सामनेवाला याची पहीली पत्नी होती. सामनेवाल्याचे वहीणी व पहिल्या बायको पेक्षा रुपालीच्या मुलांवर जास्त प्रेम होते. त्यामुळे रुपाली व वृषाली यांच्यात भांडणे होवु लागली व त्यानंतर रुपालीने रेल्वेखाली जावून आत्महत्या केली. त्यानंतर वृषाली ही सामनेवाला सोबत भांडण झाल्यावर घटस्पोट घेवून निघून गेली. त्यानंतर सामनेवाला याला त्याच्या भावाने घराबाहेर हाकलवून दिले. सदरची बाब अर्जदारला सामनेवाला व सासूने सांगितली होती. सामनेवाल्याचा मोबाईलचा पासर्वड रुपालीच्या नावाने होता, मोबाईलवर फोटो रुपालीचा, जी मेल पासर्वड, फेसबुक पासर्वड भावाच्या मुलांच्या नावाच्या होता. सामनेवाला याचा पाकिटामध्ये रुपालीचा फोटो असायचा. सामनेवाला तिचा फोटो पाहून रडतही असे यावरुनही अर्जदारला सामनेवालाने अनेकवेळा काही कारणावरुन मारहाण केली आहे. डिसेंबर २०१६ मध्ये अर्जदार गरोदर होती. सदरची गोष्ट अर्जदारने सामनेवाला याला सांगितली होती. परंतु सामनेवाला खुश दिसत नव्हता. त्यावेळी सामनेवाल्याने अर्जदारला विचारले की, सदरचे बाळ माझेच आहे ना. त्यावेळी अर्जदार म्हणाली विश्वास नसेल तर आपण डि.एन.ए. टेस्ट करुया त्यावरुन भांडणे होत होती. त्यानंतर अर्जदार रागाने माहेरी गेली. अर्जदारच्या आईने त्याला समजावले व अर्जदारला पुन्हा पुण्यात सोडणार होते त्यावेळी अर्जदाने साडी परिधान केली होती त्यावेळीही खाद्यावरील पदरावरुन त्यांचे बोलणे झाले होते. अर्जदारला सामनेवालाने गंर्भपात करण्यासाठी हॉस्पीटलला नेले होते. एप्रिल २०१६ मध्ये गरोदर पणातही सामनेवाला अर्जदारला संशयावरुन मारहाण करत असे. सामनेवाला अर्जदारला रात्री अपरात्री पहाटे घराबाहेर काढत असे, जुलै २०१७ मध्ये अर्जदारला मुल होणार होते. त्या आधीच्या रात्री सामनेवाला व नंदेला अर्जदाने फोन केला. त्यांनी अर्जदारला उत्तर दिले की, माझा आणि तुझा काहीएक संबंध नाही आम्हाला परत फोन करुन नकोस. दिनांक ०७/०७/२०१७ रोजी अर्जदारला मुलगा झाला परंतु सामनेवाला कडून कोणीही पहायला आले नाही. १५ दिवसांनी सामनेवाला बाळाला पहायला आला. अर्जदारसोबत सामनेवाला संशयावरुन नेहमी भांडण करत असे. समानेवाला हा अर्जदार सोबत अमानवी वागत होता व सतत तिच्या सोबत शारिरीक संबंध ठेवत होता. अर्जदारने शारिरीक संबध ठेवण्यास नकार दिला त्यामुळे सामनेवाला याने स्वतःच्या हातावर ब्लेड मारुन नस कापून घेतली. ऑक्टोबर २०२१ मध्ये सामनेवाल्याने अर्जदार व तिच्या मुलाला मारहाण करुन घराबाहेर हाकलुन दिले. सदर प्रकरणातील निकाल लागण्यास अवधी लागणार असल्याने अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज तिला ३०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यासाठी तसेच १५,००,०००/- नुकसान भरपाई, संरक्षणात्मक आदेश मिळण्यासाठी व अर्जदारचे मौल्यवान दागिणे सामनेवाला याच्या ताब्यात आहे ते परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१० वर म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला याचे असे कथन आहे की, अर्जदारने स्वतःच्या मर्जीने सामनेवालाचा त्याग केलेला आहे. अर्जदार हिचे विवाहबाहय संबंध असल्याने व ते सामनेवाला यांनी पुराव्यानिशी तिला वेळोवेळी रंगेहात पकडल्याने त्याचा राग मनात ठेवून सदरचा निराधार व काल्पनीक मजकुराचा अर्ज सामनेवाला विरुध्द दाखल केलेला आहे. अर्जदार हिला विवाहबाहय संबंध ठेवून मौज मजा करावयाची असल्याने व तिला लग्नाच्या बंधनात रहावयाचे नसल्याचे अर्जदातील कथनावरुन स्पष्ठ होत आहे. सामनेवाला हा अर्जदार यांना अन्न वस्त्र निवारा व इतर सुख सोई पुरविल्या असुन वार्षीक मुलाचा शैक्षणिक खर्च रक्कम रुपये २५,०००/- सामनेवाला करत आहे. सामनेवाला हा त्याच्या नोकरीचे ठिकाण त्याच्या मालकीचे घरापासून खूप अंतरावर असल्याने त्यांनी त्या ठिकाणी भाडोत्री ठेवून ते वडगोव शेरी पुणे या ठिकाणी दर महा ७,०००/- भाडे देवून राहत आहे. अर्जदारच्या भावांची व वडील यांची वेगवेगळी अलिशान घरे आहेत. लग्नात सामनेवाला यांनी अर्जदारास दिलेले दागिणे व माहेरच्या मंडळींनी दिलेले दागिणे अर्जदार जातेवेळी माहेरी घेवून गेली आहे. अर्जदारने स्वतःच्या मर्जीने सामनेवालाच्या त्याग केलेला आहे. अर्जदारच्या वडीलांची मौजे वाशिवली ता. पनवेल येथे बारमाही पिके घेणारी शेत जमीन मिळकत असून सदर मिळकती मधून अर्जदार यांच्या आई वडीलांना दरमहा २०,०००/- इतके उत्पन्न येते. अर्जदार हिच्या वडीलांच्या नावावर चारचाकी ऑटोरिक्षा असून त्यातून दरमहा ३०,०००/- इतके उत्पन्न येते. अर्जदारचे दोन्ही भाऊ चांगल्या फॅक्टरीत कामाला असून त्यांना चांगला पगार आहे. अर्जदार ही लग्नापुर्वी एका फॅक्टरीत काम करुन दर महा २०,०००/- पगार कमवत होती. अर्जदार हिने लग्नापुर्वी ग्रामपंचायत वाशीवली कार्यालयात देखील काम केलेले आहे. अर्जदारने मोठया वेअर हाऊसमध्ये रिसेप्शनिष्ठ व सुपरवायझर म्हणून देखील काम केलेले आहे. अर्जदार ही गोडावूनमध्ये नोकरी करुन प्रती महा १६,०००/- इतका पगार कमवित आहे. सामनेवाला याचा इन्क्रीमेंट लेटर प्रमाणे प्रती महा ७४,७८६/- हा ३० दिवस कामावर गेल्यावर फिक्स पगार आहे. जून २०२२ मध्ये कॉस्ट टू कंपनी अशी एकुण मासिक पगार रक्कम ९२,०४३/- अशी आलेली आहे. सामनेवाला याने कर्ज काढून घेतलेला फ्लॅट भाडयाने दिलेला असून तेथून रक्कम रुपये ६,७५०/- मासिक भाडे येते. या प्रमाणे सामनेवालाचे एकुण उत्पन्न ९८,७९३/- असे आहे. सामनेवालाकडे प्रतीमहा येणारे उत्पन्न व त्यामधून होणारी कपात असे धरुन सामनेवालाच्या प्रत्यक्ष हातात येणारा पगार ४५,५२४/- इतका आहे. जून २०२२ मध्ये सर्व खर्च वजा केला सामनेवाला याच्याकडे काहीही रक्कम शिल्लक राहत नाही. या उलट सामनेवाला याला खर्चासाठी मित्रांकडून पैसे उसने घ्यावे लागत आहे. अर्जदारचा कोणत्याही प्रकारचा छळ झालेला नाही. दिनांक २२/१०/२०२१ रोजी काही कारण नसतांना सामनेवाला याचा अर्जदारने

त्याग केलेला आहे. अर्जदार ही अतिशय रागिट व तापट स्वभावाची असून ती खोटे बोलणारी आहे. दिनांक ०९/११/२०२१ रोजी सामनेवाला याने अर्जदार हिस नांदाण्यास येणेकामी नोटीस पाठविली ती नोटीस मिळूनही अर्जदार सामनेवाला याचा कडे नांदावयास आली नाही. सासरी राहत असतांना अर्जदार सतत मोबाईलवर कोणाशीतरी गप्पा मारत मोबाईल दुर ठेवणे, लपवून ठेवणे जाणून बुजून हेतू पुर्वक मोबाईल लॉक करुन ठेवने सतत मोबाईल पासवर्ड बदल करणे असे करत असे. त्यामुळे सामनेवाला घरात व समाजात प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अर्जदार सामनेवालावर विनाकारण संशय घेत होती. अर्जदारच्या बाळंतपणाचा व औषधोपचाराचा खर्च सामनेवाला याने केलेला आहे. अर्जदार हिच्या रागिट व हट्टी स्वभावामध्ये मुलगा झाल्यानंतर कोणताही बदल झालेला नाही. सामनेवाला हा प्रायव्हेट कंपनीत नोकरस असून त्याची कामाच्या ठिकाणी जास्तीत जास्त रात्र पाळी असते त्यामुळे सामनेवाला याला दिवसा झोप आवश्यक असल्याचे माहीत असतांनाही अर्जदार ही सामनेवाला यास त्रास देत होती. दिनांक ०१/०८/२०२१ रोजी नाईलाजास्तव सामनेवाला यांनी चंदन नगर पोलिस ठाण्यात अर्जदार विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. दिनांक २८/०९/२०२१ रोजी अर्जदार कडाक्याचे भांडण करुन घराबाहेर पडल्या व अनोळखी इसमाच्या गाडीत बसून माहेरी गेल्या त्या तिसऱ्या दिवशी तिच्या माहेरी पोहच झाल्या बाबत त्याच्या सासऱ्यांनी सांगितले. दिनांक २२/१०/२०२१ रोजी कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना अर्जदार तिच्या माहेरी निघून गेलेली आहे. अर्जदाने सामनेवाला याला वैवाहिक सुकापासून वंचित ठेवलेले आहे व त्यांचा त्याग केलेला आहे. सामनेवालावर वयोवृध्द आई वडीलांची जबाबदारी आहे. अर्जदारने सामनेवालाचा स्वतःहून त्याग केला असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. त्यानंतर सामनेवालाने निशाणी क्र.२४ वर त्याचे जादा म्हणणे दिलेले आहे. त्यामध्ये सामनेवालाने असे कथन केलेले आहे की, सामनेवाला याचा प्रतीमहा पगार ठराविक नसून प्रत्येक महिन्याच्या पगार तयार केलेल्या प्रोडक्टची कॉलीटी, कामाचे तास, रजा, ब्लॉक क्लोझर, रिजेक्शन डिलेवरी या बाबी गृहीत धरुन कॅक्युलेट केला जातो. याचा अर्थ सामनेवालाचा पगार कधी जास्त तर कधी खुप कमी प्रमाणात येत असतो. अर्जदार यांनी पुर्वीचा कायदेशी घटस्पोट घेतलेला नसतांना खोटे नाटे बोलून सामनेवालाची फसवणूक केलेले आहे. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला हे कायदेशीर पतीपत्नी होवून शकत नसल्यामुळे अर्जदार हिला पोटगी अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे अर्ज ना मंजूर करण्यात यावा.

५. अर्जदारातर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. एस. एस. पालांडे व सामनेवाले तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. आर. व्ही. तौर यांचा युक्तीवाद ऐकला.

| अ.न. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे का? | होय. |
| २. | अर्जदार ही पोटगी रक्कम रुपये दरमहा खर्चासाठी रक्कम रु. ३०,०००/- मिळण्यास पात्र आहे का? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | अर्जदार तात्पुरता संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ४. | अर्जदार ही नुकसान भरपाई रक्कम रुपये १५ लाख मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ५. | अर्जदार ही सत्री धन परत मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ६. | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

६. अर्जदाराने प्रस्तुत अर्जा सोबत दिनांक ०९/११/२०२१ रोजी सामनेवाला याने तिला पाठविलेल्या नोटीसची प्रत, रेशन कार्डची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची झेरॉक्स प्रत, विवाह नोंदणी फार्मची प्रत, दिनांक २२/१०/२०२१ रोजी चंदन नगर पोलिस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीची प्रत, फोटो, यज्ञेश सतिष पाटील याच्या जन्म प्रमाण पत्राची झेरॉक्स प्रत व घटस्पोटाच्या दस्ताची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. या उलट सामनेवाला याने निशाणी क्र.२५ वरील कागद यादी सोबत एप्रिल, मे व जून या महिन्याचे पगार पत्रकाची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच अर्जदारच्या बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत सामनेवला याने दाखल केलेली आहे. त्याच प्रमाणे सामनेवाला याने निशाणी क्र.२६ वरील कागद यादी सोबत त्याचे मालमत्ता व दायीत्व प्रमाणपत्र, सामनेवाला याचे खाते उतऱ्याची प्रत, मुलाच्या ॲडमिशनसाठी रक्कम रुपये ६,०००/- भरल्या बाबतची सत्य प्रत, मार्च, एप्रिल, मे व जून २०२३ या महिन्यांचे पगार पत्रकाची सत्यप्रत, सदनिका नं.५०६ या फ्लॅट मिळतीचा ईंडेक्स २ ची झेरॉक्स प्रत, गृह कर्ज रक्कम दर्शविणारे बॅकेचे ऑनलाईन तपशिल, सॅडविक सोसायटी यांच्याकडून रक्कम रुपये ७ लाख कर्ज घेतल्या बाबतची पासबुकची झेरॉक्स प्रत व सदनिका नं.५०६ या मिळकतीचा लिव ॲण्ड लायसन्स करार नाम्याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. अर्जदारने तिचे मालमत्ता व दायीत्वाचे प्रमाणपत्र निशाणी क्र.१३ वर दाखल केलेले आहे. अर्जदाराचे निशाणी क्र.१३ वरील प्रतीज्ञापत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यामुध्ये अर्जदाराने तिचे शिक्षण १२ वी इतके नमूद केलेले आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून तिच्यावर मुलगा यज्ञेश याची जबाबदारी असल्याचे नमूद केलेले आहे. या उलट सामनेवालाचे निशाणी क्र.२७ वरील प्रतीज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

सामनेवालाने त्याचे शिक्षण बी.एस.सी. रसायन शास्त्र असे नमूद केले असून तो सध्या त्याच्या नोकरीच्या ठिकाणी त्याच्या मालकीच्या ठिकाणी मंत्रा मोमेंन्टस् या ठिकाण विंग एफ मधील सदनिका नं.५०६ यामध्ये भाडोत्री ठेवून तो वडगांव शेरी येथे भाडे तत्वावर राहत असल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे सामनेवालाने तो प्रोडक्शन टेक्नोलॉजीस्ट म्हणून सॅडविक कोरोमन्ट प्रा.ली. पुणे येथे नोकरीस असून त्याचा पगार कधी जास्त तर कधी खुपच कमी प्रमाणत येतो असे कथन केलेले आहे. सामनेवाल्याने त्याच्यावर त्याच्या आई वडीलांची जबाबदारी असल्याचे देखील प्रतीज्ञापत्रामध्ये नमूद केलेले आहे.

<u>मुद्दा क्र. १ ते ६ साठी -</u>

७. मुख्य अर्ज, प्रस्तुत अर्ज, म्हणणे व पटलावर दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाले हे पती पत्नी आहेत याबाबत दोन्ही पक्षात वाद नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांच्यात पती पत्नी हे नाते आजही कायम आहे याबाबत देखील वाद नाहीत. त्याचप्रमाणे सदर विवाह संबंधातून अर्जदार व सामनेवाला यांना एक मुलगा यज्ञेश आहे याबाबत देखील दोन्ही पक्षात वाद नाही. घरगुती हिंसाचार कायद्याचे कलम २३ चे अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथम दर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्रामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की, समानेवालाने तिला तीच्या चारित्र्यावर संशय घेवून ती सासरी नांदत असतांना तिचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. सामनेवाला हा अर्जदारला नेहमी तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ व मारहाण करत असे. सामनेवाला हा अर्जदारच्या छोटया मोठया गोष्टींवर नेहमी निबंर्ध घालत असे तिला लॉक करुन ठेवत असे. सामनेवाला हा अर्जदारला अमानविय वागणूक देवून तिला सतत शारिरीक व मानसिक त्रास देत असे. ऑक्टोबर २०२१ मध्ये सामनेवाला याने अर्जदार व तिच्या मुलाला घराबाहेर हाकुन दिले. तेव्हा पासून अर्जदार तिच्या माहेरी राहत आहे. दिनांक २२/१०/२०२१ पासून सामनेवालाने अर्जदारचा कोणतेही कारण नसतांना त्याग केलेला आहे व तिच्या उदनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. याउलट सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार ही स्वतःच्या इच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार ही तापट व हट्टी स्वभावाची आहे. अर्जदार हचे बाळंतपाणाचा व औषधोपचाराचा संपुर्ण खर्च सामनेवालाने केलेला आहे. अर्जदार ही सामनेवाला घरी नसतांना पर पुरुषांबरोबर सासरी आलेली आहे. दिनांक २२/१०/२०२१ रोजी अर्जदार ही अनोळखी इसमाच्या गाडीत सामनेवाला याची परवानगी न घेता, न सांगता माहेरी ये जा करते, पुण्यात फिरते या बाबत विचारणा केली असता, सामनेवाला याच्या बरोबर कडाक्याचे भांडण करुन सामनेवाला यास शिवीगाळ करुन स्वइच्छेने माहेरी निघून गेलेली आहे. सामनेवालावर त्यांच्या

आई व वडीलांची जबाबदारी आहे. याउलट अर्जदार ही सुशिक्षत असून ती लग्ना पुर्वी एका फॅक्टरीत असून दर महा २०,०००/- रुपये कमवित होती, ती ग्राम पंचायत वाशीवली येथे देखील कामास होती, ती मोठया वेअर हाऊसमध्ये रिसेप्शनिष्ठ व सुपरवायझर म्हणून कामास होती ती सध्या गोडावूनमध्ये नोकरी करुन प्रतिमहा १६,०००/- रुपये कमवित आहे. तिला उपजिविकेचे साधन आहे. त्यामुळे तिला अन्न, वस्त्रासाठी पोटगीची कोणतीही आवश्यकता नाही. सा.वाला. याची अर्जदाराला पोटगी देण्याची ऐपत नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

८. सामनेवाला याने अर्जदार व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाहाची व पालनपोषणची कोणतीही सोय केलेली नाही. घरगुती हिंसाचार कायद्यामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे हे सुध्दा हिंसाचार या व्याख्येत बसते. अभिलेखावरील सर्व कागदपत्रे तसेच दोन्ही पक्षांची कथने पाहता सामनेवाले यांने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहासाठी काही रक्कम दिली असे कुठेही दिसून येत नाही. तसेच सामनेवाले याची अर्जदार व त्यांचा मुलगा यांना सांभाळण्याची जबाबादारी असतांना त्याने ती जबाबदारी पार पाडलेली नाही यावरुन अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

९. अर्जदार ही सामनेवालाची पत्नी आहे. सामनेवालाने पती या नात्याने त्याची अर्जदारांचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असतांना ती जबाबदारी टाळलेली आहे. सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार ही सुशिक्षीत असून तिला नोकरी आहे. परंतु अर्जदार नोकरीस असल्याबाबत सा.वालाने त्याच्या तोंडी कथनाशिवाय कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदाराने नि.१३ वर तिचे मालमत्ता व जबाबदाऱ्या याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यामध्ये तिचे शिक्षण १२ वी पर्यंत झाल्याचे व तिला उत्पन्नाचे साधन नसल्याबाबत शपथेवर कथन केले आहे. तसेच सध्या ती तिच्या माहेरी राहत असल्याचे शपथेवर कथन केले आहे. याउलट अर्जदाराचे असे कथन आहे की, सा.वाला हा सॅडविक कोरोमंन्ट इंडिया प्रा. ली. या कंपनीत प्रोडक्शन टेक्नॉलॉजीस्ट म्हणून नोकरीस आहे. सा.वालावर अर्जदार व मुलगा यज्ञेश यांचेशिवाय इतर कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे सामनेवालाची अर्जदारला पोटगी देण्याची ऐपत आहे. सामनेवालाने त्यांच्या शपथ पत्रामध्ये त्याचे उत्पन्न कसे आहे त्याचा सविस्तर तपशिल दिलेला आहे. सामनेवालाने दाखल केलेल्या पगार पत्रकांवरुन सामनेवालाला उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते. सामनेवाल्याचे असे कथन आहे की, त्याच्या पगारातून फंड टॅक्स व इतर डिडक्शन होत असल्यामुळे त्याला ना ईलाजास्त त्याच्या मित्रांकडून उसने पैसे घ्यावे लागता. परंतु सामनेवाला याच्या पगारातून डिडक्शन होत असल्यामुळे तो अर्जदारला पोटगी देण्यास सक्षम नाही असे अनुमान काढता

येणार नाही. सामनेवालाने दाखल केलेल्या एप्रिल, मे, जून २०२३ च्या पगार पत्रकांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सामनेवालाचा ग्रॉस अर्निंग ९३,४३३/- इतका मार्च २०२३ मध्ये असून त्यापैकी डिडक्शन ५१,०३५/- इतके आहे व नेट सॅलरी ४२,३९९/- इतकी आहे. त्याच प्रमाणे एप्रिल २०२३ मध्ये नेट सॅलरी ५३,५७४/- इतकी असून मे २०२३ मध्ये ३९,५५७/- इतकी आहे. सामनेवालाने त्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्याला नोकरी असल्याचे मान्य केलेले आहे. सामनेवालाचे शिक्षण देखिल बी.एस.सी. रसायन शास्त्र पर्यंत झालेले आहे. यावरुन सामनेवालाला उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते.

१०. अर्जदाराने प्रस्तूत अर्जात अंतरीम पोटगी म्हणून ३०,०००/- रूपये मिळावी अशी मागणी केली आहे. वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता अर्जदारास निश्चितपणे प्रस्तुत प्रकरण चालविण्यासाठी तसेच न्यायालयीन कामकाज करणेकरीता खर्चापोटी तसेच मुलगा यज्ञेशच्या शिक्षण व संगोपणासाठी पैशाची गरज आहे. अर्जदाराने अंतरिम पोटगी प्रतिमहिना रक्कम रूपये ३०,०००/- प्रत्येकी अशी मागणी केली आहे. पंरतू सदर मागणी सद्य स्थितीत अवाजवी दिसून येत आहे. अर्जदार व सामनेवाले यांचे उत्पन्नाचे स्त्रोत, राहणीमानाचा दर्जा, महागाई, वयोमान तसेच सामनेवालाचे प्रतीज्ञापत्रातील कथन लक्षात घेता सामनेवालाने अर्जदार व त्यांचा मुलगा यांना दरमहा रूपये ८,०००/- अंतरीम पोटगी देणे उचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. त्याचप्रमाणे अर्जदारची मागणी तात्पुरता संरक्षण आदेश, नुकसान भरपाई, स्त्रीधन परत मिळण्या बाबतचा आदेश या मागण्यांचा विचार अर्जाचा अंतिम सुनावणीचा वेळी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर करणे उचित होईल त्यामुळे मी मुद्दा क्र.३ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.६ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला याने अर्जदार व त्यांचा मुलगा यज्ञेश यांना दरमहा रक्कम रूपये ८,०००/-(रूपये आठ हजार मात्र) अंतरीम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून दयावी.

३. सामनेवाले यांना आदेशित करण्यात येते की, वरीलप्रमाणे अंतरिम पोटगी दर महिन्याच्या १० तारखेच्या आत अर्जदारास देण्यात यावी.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2025.06.23 18:28:36 +0530

**(डी. एस. खोत)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक -२३/०६/२०२५.